# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

४ था मजला, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९ , खेरवाडी, वांद्रे (पुर्व), मुंबई- ४०० ०५१.

दू.क्र:०२२६२५४२-१५१/१५३/१००

Email: secretary@msbte.com संकेत स्थळ :www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-५५/सांकासं/२०२३-२४/ 823 दिनांक- 8 FEB 2023

परिपत्रक

प्रति,
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पूणे,नागपुर व औरंगाबाद.

**विषय:-** **भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने ७५ महाविद्यालयांमध्ये ७५ कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत.**

**संदर्भ:-** **मा. सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रं. सांकासं/५१६ दि.२५/०१/२०२३**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाकीत पत्रान्वये मा. सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांनी कळविले आहे की, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्य सैनिक, क्रांतीवीर स्वातंत्र्य चळवळीतील योध्यांची माहिती नवीन पिढीला माहिती व्हावी तसेच त्यांच्यामध्ये देशभावनेची प्रेरणा निर्माण व्हावी, या हेतूने 'आझाद हिंदची गाथा' हा कार्यक्रम ७५ ठिकाणी, ७५ संस्थांमार्फत आयोजित करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे.

अमृत महोत्सवाची भावना एकत्रितपणे साजरी करण्यासाठी, सर्व महाविद्यालयांच्या नाट्य विभाग, सांस्कृतीक विभाग, एनएसएस विभागाचे विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयांमध्ये 'आझाद हिंदची गाथा' नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील ७५ संस्था/महाविद्यालयांमध्ये 'आझाद हिंद ची गाथा' नाटक एकाच वेळी ७५ ठिकाणी, ७५ नाट्यप्रयोग सादर होणार आहे. सदरचा नाटक प्रयोग दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व संस्थाना सोबत जोडलेल्या पत्राच्या अनुषंगाने वर नमुद कार्यक्रमाबाबत अवगत करुन जास्तीत जास्त संस्था ह्या कार्यक्रमात सहभाग घेतील याकरीता प्रयत्न करावे व त्याबाबतचा अहवाल मंडळास सादर करावा.

(डॉ. महेंद्र चितलांगे)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहितीस्तव सादर:

- मा. संचालक, म. रा. तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई.